|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे यांच्या वतीने दि. ७ ते १२ ऑगस्ट या कालावधीत उच्च संशोधन उपकरणे हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील ४० अध्यापकांसाठी हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विषयातील अध्यापक यामध्ये सहभागी होतील. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्यात येत असून प्रशिक्षणार्थींची व्यवस्था विद्यापीठात केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक तथा भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.ए.एम. महाजन यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## बातमी नं. २

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह अंतर्गत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यावेळी उपस्थित होते. संचालक प्रा.ए.एम. महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रा.डोंगरे यांनी नव्या धोरणात विद्याशाखांच्या सीमा आता राहिलेल्या नाहीत असे सांगितले. यावेळी घेण्यात आलेल्या पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले. यामध्ये लेखमाला इंगळे हिने प्रथम, अनिरूध्द मांडेकर याने द्वितीय तर राहिणी नुक्ते हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रा.एस.टी. बेंद्रे यांनी पोस्टर स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एस.एस. घोष यांनी केले. डॉ.डी.जे. शिराळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. पी.जी. चव्हाण, डॉ. जसपाल बंगे आणि डॉ. वंदना शिंदे यांनी केले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ३१ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी